श्रीकृ[illegible]ध.

व कृष्णशिष्टाईचे श्लोक.



किंमत ६ आणे.

(ज्ञानमाळा)

श्रीकृष्णबोध.

हें पुस्तक

बाळकृष्ण लक्ष्मण पाठक

यांनीं तयार केलें

तें

मुंबईंत

"गणपत कृष्णाजी" छापखान्यांत छापिलें.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें

रजिस्टर केलें असे.

शके १८२३,—सन १९०२.

किंमत ६ आणे.

प्रस्तावना.

"यथासांग तें कर्म कांहीं घडेना ॥
"घडे कर्म तें पुण्य गांठीं पडेना ॥"

संसारामध्यें मनुष्य प्राणी जीं जीं कर्में आचरतो त्यापैकीं कित्येक सद्गतीस नेणारीं व कित्येक दुर्गतीस नेणारीं अशीं असतात. परंतु अज्ञानत्वाच्या योगानें कृतकर्मांपैकीं उच्च व नीच यांची निवड करितां येत नाहीं, यामुळें परलोकप्राप्तीस व्यर्थ पराङ्मुख व्हावें लागतें. ही अडचण निरसन व्हावी एतदर्थ श्रीकृष्ण परमात्म्यानें अर्जुनास जो बोध केला आहे तो मूळ ग्रंथाच्या आधारानें भाषांतररूपानें प्रसिद्ध केला आहे. तरी त्याप्रमाणें वागून आपलें जन्मसार्थक्य करून घेणें हें प्राणिमात्राचें मुख्य कर्तव्य आहे.

प्रकाशक.

॥ श्रीगणेशायनमः ॥

श्रीकृष्णबोध.

एकेसमयीं परीक्षिति राजा, वर्णाश्रमधर्माप्रमाणें नित्यनैमित्तिक कर्मे आचरून जगदीशाचे गुणानुवाद श्रवण करीत बसला असतां, ज्यांनीं योगसाधनानें व तपाचरणानें ब्रह्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठत्व मिळविलें, या अशाश्वत जगाशीं संबंध न ठेवण्याच्या इच्छेनें ज्यांनीं मातेच्या उदरांत बारा वर्षेपर्यंत वास केला, असे जे त्रिकालज्ञ, शुकमुनि ते अकस्मात् आलेले पाहून राजानें साष्टांग प्रणिपात केला, आणि एका रत्नजडित सिंहासनावर त्यांस बसवून यथासांग अर्घ्यपाद्य पूजा केली. नंतर पंचपक्वान्नी षड्रस अन्नाचें भोजन उरकल्यावर शुकमुनि सुप्रसन्न आहेत असें पाहून राजानें हस्त जोडून प्रार्थना केली कीं, हे कृपासिंधो, दीनदयाळा, आपल्या कृपेनें नित्यशः वेदश्रुति

आणि पुराणें ऐकिल्यानें माझें अंतःकरण शुद्ध व तेजोमय झालें आहे; परंतु संसारांत आपण जीं जीं कर्मे करितों त्यांपैकीं उच्चतेच्या योगानें सद्गतीस नेणारीं व नीचतेच्या योगानें कुमतीस नेणारीं कोणकोणतीं आहेत, ही जी शंका माझे मनांत उद्भवली आहे तिचें निरसन झाल्यास मला अतिशय समाधान वाटेल. परीक्षिति राजाची ही विनंती ऐकून शुकमुनि प्रसन्न मनानें ह्मणाले—राजा, हा तुझा प्रश्न संसारी जनांस हितकर असून आज जसें तुझें मन शंकित झालें, त्याचप्रमाणें पूर्वी अर्जुनाच्याही मनांत अशाप्रकारची शंका उद्भवली होती. त्यावेळीं भगवान श्रीकृष्णानें जो त्यास बोध केला तो मी तुला कथन करितों; एकाग्र चित्तानें श्रवण कर. असें सांगून शुकमुनि ह्मणतातः—

हे राजा, एके समयीं परमात्मा श्रीकृष्ण अर्जुनाच्या भेटीकरितां प्रभातकालीं गेला असतां अर्जुन निजला आहे असें कंचुकीनें सांगितलें.

तें ऐकून श्रीकृष्णास मोठें आश्चर्य वाटलें; परंतु इतक्यांत स्वप्नांत श्रीकृष्णदर्शन झाल्यामुळें अर्जुन खडबडून उठला, तोंच सेवकानें वसुदेवात्मज आल्याची वर्दी दिली: त्याबरोबर मोठ्या उत्सुकतेनें धांवत जाऊन अर्जुनानें प्रभुचरणीं लोटांगण घातलें आणि हस्त जोडून प्रार्थना केली कीं, हे सच्चिदानंदा, जगदीशा, माझ्या हातून अज्ञानपणाच्या योगानें हा जो महत् अपराध घडला आहे तो क्षमा करून माझें रक्षण कर. हें ऐकून श्रीकृष्ण ह्मणाले—अर्जुना, तूं मोठा ज्ञानी व बुद्धिमान आहेस, तथापि महत्संकटानें एकवेळ प्राप्त होणाऱ्या मनुष्यदेहास हा वेळपर्यंत निजणें उचित नाहीं. हें भगवानाचें भाषण ऐकून अर्जुन ह्मणाला, हे दीननाथ, सेवकाच्या हातून अज्ञानपणानें घडलेला अपराध क्षमा करा, व संसारांत अहितकारक कोणकोणतीं कर्में आहेत हें कृपा करून या दासास निवेदन करा. अर्जु-

नाचें हें लीनतेचें भाषण ऐकून श्रीकृष्ण ह्मणतात. मित्रा, वेदश्रुतीस व देवादिकांस अगम्य अशीं जीं परमार्थसुखास अहितकारक कर्मे तीं मी तुला सांगतों, तिकडे चित्ताचें अवधान असूंदे.

नीति १ ली. श्रीकृष्ण ह्मणतातः—हे अर्जुना, मनुष्य प्राण्यास सूर्योदय होईपर्यंत आंथरुणावर पडून राहणें उचित नाहीं. कारण सूर्योदय होण्याचे पूर्वी एक प्रहर रात्रीस सूर्यनारायणाचें व दैत्यांचें तुंबळ युद्ध होऊन ऐशीं हजार दैत्यांचा वध करून सूर्य उदय पावतो, आणि ते मृत दैत्यही पुन्हा जिवंत होतात. ह्याकरितां प्रहररात्र बाकी राहिली ह्मणजे मनुष्यप्राण्यानें उठून दीनदयाळ परमेश्वराचें ध्यान व भजन करावें आणि अरुणोदयाचे वेळीं स्नान करून श्रीसूर्यनारायणास अर्घ्यप्रदान देऊन नमस्कार करावा, व पितृदेवतांचेंही तर्पण करावें अशा विधीनें वागणाऱ्या मनुष्यास श्रीसूर्यनारायण व पितृदेव जो आशी-

वाद देतात त्या योगानें तो मनुष्य इहलोकीं आणि परलोकीं उत्तम प्रकारें सुख भोगितो.

नीति २ री. श्रीकृष्ण ह्मणतातः—हे कुंतीपुत्रा, आपल्या पलंगावर किंवा आंथरुणावर आपल्या विवाहित स्त्रीशिवाय दुसऱ्या मनुष्यास निजूं देणें पापमूलक आहे. कारण विवाहित स्त्री आपली अर्धांगी असून पापपुण्याची वांटेकरीण आहे, परंतु दुसरें मनुष्य जर आंथरुणावर निजलें तर तेंही आपल्या पापपुण्यास साथीदार होतें. हें ऐकून अर्जुन ह्मणाला—हे कृपानिधे, आपल्या घरीं जर एखादा पाहुणा आला आणि दुसरें आंथरुण नसलें तर काय करावें? श्रीकृष्ण ह्मणाले—जर दुसरें आंथरुण नसलें तर ज्यानें त्यानें आपलें वस्त्र बिछान्यावर आंथरून निजलें असतां दोष लागणार नाहीं.

नीति ३ री. श्रीकृष्ण ह्मणतातः—हे अर्जुना, विधवा स्त्रीनें शिजविलेलें अन्न भक्षण करणें दो-

यमूलक आहे. कारण पति मरण पावल्यानंतर स्त्रीही अर्धमृत होते, ह्यास्तव. तिच्या हातचें अन्न ग्रहण केलें असतां मुक्ति मिळणें दुर्लभ होते.

नीति ४ थी. श्रीकृष्ण ह्मणतातः—हे अर्जुना, संध्याकाळचे वेळीं घरापुढील आंगणे झाडणारा मनुष्य अवश्य दरिद्री होतो. कारण त्यावेळीं प्रत्यक्ष लक्ष्मी घरोघरीं फिरत असत्ये व ज्याच्या हातांत केरसुणी पाहत्ये त्यास दरिद्री होशील असा शाप देते.

नीति ५ वी. श्रीकृष्ण ह्मणतातः—हे अर्जुना, एकादशी किंवा कोणतेंही व्रत आचरून त्या दिवशीं स्त्रीशीं गमन करील तर त्यास व्रताचें फल प्राप्त होणार नाहीं. हें ऐकून अर्जुनानें हस्त जोडून विनंती केली कीं, एखाद्या स्त्रीस व्रताचे दिवशींच ऋतुस्नात होऊन पांचवा दिवस आला असून त्या दिवशीं तिच्याशीं गमन न केल्यास महत् पातक लागतें व गमन केल्यास व्रत

निष्फल होतें,तेव्हां व्रती मनुष्यानें काय करावें ? हें ऐकून श्रीकृष्ण ह्मणाले—अर्धी रात्र झाल्यानंतर ऋतुस्नात स्त्रीशीं गमन केल्यास दोष नाहीं. कारण रात्रीचे शेवटचे दोन प्रहर दुसरे दिवसांत गणले जातात.

नीति ६ वी. श्रीकृष्ण ह्मणतातः—हे अर्जुना, दीपकामध्यें एक वेळ पेटविलेली वात पुन्हां दुसरे दिवशीं पेटविणें पापमूलक असून ह्या पातकाच्या योगानें त्या मनुष्याची स्त्री पुष्कळ दिवसपर्यंत वांझ राहील. हें ऐकून अर्जुनानें प्रार्थना केली कीं, हे भगवन् आपण जी नीति सांगतां त्यायोगें या दासाचे अंतःकरणांत अति आनंद प्राप्त झाला आहे, यास्तव कृपा करून आणखी कांहीं आज्ञा करा.

नीति ७ वी. श्रीकृष्ण ह्मणतातः—हे अर्जुना, जो मनुष्य सूर्यनारायणासन्मुख उभा राहून तोंड धुवील किंवा जलाशयांत अथवा अग्नीमध्यें चूळ टाकील तो मनुष्य अंतकालीं नरकवास

भोंगील. कारण सूर्य अग्नि आणि जल ह्या तिन्ही देवता श्रेष्ठ असून प्रतिदिवशीं ह्यांचें पूजन करणें मनुष्य प्राण्यास उचित आहे. हें ऐकून अर्जुन ह्मणाला– हे घनश्यामा, प्रतिदिवशीं ह्या तिन्ही देवतांचें पूजन कोणत्या विधीनें करावें हें मला सांगा. तेव्हां श्रीकृष्ण ह्मणाले–प्रतिदिवशीं प्रातःकाळीं स्नान करून श्रीसूर्यनारायणास तांब्याच्या भांड्यांत पाणी घेऊन अर्घ्यप्रदान करावें आणि मनःपूर्वक ध्यानधारणा करून रविवारीं व्रतस्थ राहावें; परंतु व्रतस्थ राहण्यास अडचण असेल तर विधियुक्त सूर्यनारायणाचें पूजन करून उपवासी राहावें,ह्मणजे सूर्यदेवता प्रसन्न होऊन उत्तम प्रकारचा आशीर्वाद देते. तसेंच प्रातःकालीं स्नान केल्यानंतर जलदेवतेचें ध्यान करून थोडें दूध अर्पण करावें व गंधपुष्पादि यथायुक्त विधीनें पूजन करावें ह्मणजे जलदेवता प्रसन्न होऊन उत्तम प्रकारचा कल्याणदायक आशीर्वाद देतात, तसेंच नित्यशः स्नान केल्यानंतर अग्निदे-

वतेचें ध्यान करून भोजनसमयीं विधियुक्त पूजन करावें व सर्व पदार्थांचा अग्निनारायणास नैवेद्य अर्पण करावा, ह्मणजे अग्निदेवता सुप्रसन्न मनानें आशीर्वाद देते. सारांश अशा रीतीनें वागणाऱ्या मनुष्यास ह्या तिन्ही देवतांच्या आशीर्वादेंकरून इहलोकीं सर्व प्रकारचीं सुखें प्राप्त होऊन अंतकाळीं वैकुंठवास प्राप्त होतो.

नीति ८ वी. श्रीकृष्ण ह्मणतातः—हे अर्जुना, प्रज्वलित दीपक विझविणें व एका दिव्यावर दुसरा दिवा पेटविणें पापमूलक आहे.

नीति ९ वी. श्रीकृष्ण ह्मणतातः—हे अर्जुना, व्रती मनुष्य पलंग किंवा बाज यांजवर निजेल तर त्याचें व्रत निष्फळ होईल. कारण ज्या देवतेचें व्रत करावें ती देवता व्रताचे दिवशीं व्रती मनुष्याचे शरीरांत सदैव वास करिते, ह्याकरितां व्रती मनुष्यानें शुचिर्भूतपणानें वागून एकवेळ फलाहार करावा व पलंगावर किंवा बाजेवर न निजतां

स्त्रीविरहित जमिनीवर निजावें ह्मणजे व्रतदेवता प्रसन्न होतात आणि व्रतही सफल होतें.

नीति १०वी. श्रीकृष्ण ह्मणतातः—हे अर्जुना, व्रताचे दिवशीं आपलें उच्छिष्ट दुसऱ्यास देऊं नये. कारण जो कोणी तें उष्टें खाईल तो आपल्या व्रताचे फलांत वांटेकरी होईल, व आपणांस दोष लागेल.

नीति ११ वी. श्रीकृष्ण ह्मणतातः—हे अर्जुना, स्वयंपाक पूर्ण झाल्याशिवाय मध्येंच भोजनास बसणें किंवा अग्निनारायणास आहुती दिल्याशिवाय अन्नग्रहण करणें अथवा पात्राशिवाय नुसतेंच अन्न जमिनीवर ठेवणें ह्या तिन्ही पातकांच्या योगानें मनुष्य सदां दरिद्री होईल ह्याकरितां मनुष्य प्राण्यास उचित आहे कीं, स्वयंपाक सिद्ध झाल्यावर शुचिर्भूत होऊन प्रथम अग्निनारायणास आहुती द्यावी. नंतर अन्नदेवतेस व गृहदेवतेस नैवेद्य समर्पण करून अतिथींस यथा-

शक्ति अन्नभाग अर्पण करावा आणि मग भोजन करावें. ह्मणजे अग्निदेवता, गृहदेवता व अन्नदेवता यांच्या आशीर्वादेंकरून तो मनुष्य सदा सुख भोगील.

नीति १२ वी. श्रीकृष्ण ह्मणतातः—हेअर्जुना, तांब्याचें भांडें उष्टें करणें किंवा शौचास नेणें महत् पातक आहे. कारण सर्व धातूंमध्यें तांबें पवित्र असून तांब्याच्या भांड्यांत पाणी घेऊन स्नान केलें असतां गंगास्नानाचें पुण्य प्राप्त होतें व पितृदेवतेस तांब्याच्या भांड्यानें जल अर्पण केलें असतां महत् पुण्य लागतें.

नीति १३ वी. श्रीकृष्ण ह्मणतात-हे अर्जुना, ब्रह्महत्या केली असतां किंवा परस्त्रीगमन केलें असतां हजार वर्षें पर्यंत नरकवास प्राप्त होतो. तसेंच परस्त्रीगमनानें पुत्रप्राप्ति झाल्यास पुण्याचा क्षय होतो. पितृदेवता तर्पण श्राद्धास विन्मुख होऊन अक्षय नरक-

वास भोगितात. हें पाप सर्व प्रकारच्या पातकांत श्रेष्ठ मानिलें आहे.

नीति १४ वी. श्रीकृष्ण ह्मणतातः—हे अर्जुना, स्त्रीसंगानंतर स्नान न करितां जो मनुष्य अपवित्रतेनें राहतो त्याचें चालतांना पृथ्वीवर पडणारें प्रत्येक पाऊल पितृदेवतेच्या मस्तकावर दिल्याप्रमाणें होतें व पातकाच्या योगानें अंतकाळीं नरकवास प्राप्त होतो.

नीति १५ वी. श्रीकृष्ण ह्मणतात;-हे अर्जुना, अमावास्येच्या दिवशीं झाडाची डाहाळी किंवा पान तोडून तोंड धुतलें असतां ब्रह्महत्त्येचें पातक लागतें

नीति १६ वी. श्रीकृष्ण ह्मणतातः-हे अर्जुना, एखाद्या अतित अभ्यागतानें आपणाजवळ कांहीं मागितलें असतां जर आपण त्याची यथाशक्ति मनकामना पूर्ण केली तर महत् पुण्य लागतें; आणि जर त्याची निराशा केली तर महत पातक लागतें.

नीति १७ वी. श्रीकृष्ण ह्मणतातः—हे अर्जुना,

मोडक्या वस्तु किंवा फुटकीं भांडीं घरामध्यें असणें हें दरिद्र प्राप्त होण्याचें लक्षण आहे.

नीति १८ वी. श्रीकृष्ण ह्मणतातः—हे अर्जुना, जेवतांना पाणी पितांना, उठतांना, बसतांना, काम करतांना, किंवा चालतांना जो मनुष्य परमेश्वराचें नामस्मरण करील तो या सुकृताच्या योगानें इह लोकीं आणि परलोकीं परम सुख भोगील, परंतु जो मनुष्य नेहमीं परमेश्वराचें स्मरण करणार नाहीं तो सदोदीत दुःख भोगून या पापापासून कधींही मुक्त होणार नाहीं.

नीति १९ वी. श्रीकृष्ण ह्मणतात—हे अर्जुना, कोणाही मनुष्याबरोबर एका पात्रांत बसून भोजन करणें हें मोठें पाप होय, कारण तो मनुष्य मागले जन्मीं कोणत्या जातीचा किंवा प्रकृतीचा होता हें आपणांस माहीत नसल्यामुळें एके ठिकाणीं भोजन केल्यानें त्याची व आपली प्रकृती समान होते.

नीति २० वी. श्रीकृष्ण ह्मणतातः—हे अर्जुना, भोजन करतेसमयीं मौन धारण करावें. कारण अन्न देवता त्यावेळीं आपल्या मुखांमध्यें वास करीत असल्यामुळें तोंडानें जर असत्य भाषण किंवा परनिंदा केली तर अन्नदेवता शाप देते. व त्यामुळें सर्व जन्मभर विपत्ती भोगावी लागते. ह्याकरितां मनुष्य प्राण्यास उचित आहे कीं, भोजनसमयीं शुचिर्भूत राहून मनामध्यें अन्नदेवतेची स्तुती करावी; ह्मणजे तो मनुष्य सर्वकाळ सुख भोगील. हें ऐकून, अर्जुनानें विनंती केली कीं, हे जगदीशा, भोजनसमयीं कोणाजवळ बोलणें अवश्य असलें तर कसें करावें ? श्रीकृष्ण ह्मणाले—जर कोणाजवळ बोलण्याची विशेष जरूर असेल तर प्रथम पांच ग्रास ग्रहण केल्यानंतर आचमन करून जें बोलणें असेल तें बोलावें. परंतु असत्य भाषण किंवा परनिंदा मात्र करूं नये.

नीति २१ वी. श्रीकृष्ण ह्मणतातः—हे अर्जुना,

सुवर्तनीय विवाहित स्त्रीची निंदा करणें, विनाकारण तिचा छल करणें किंवा ताडण करणें हें महापातक होय. ह्या पापाच्या योगानें ह्या लोकीं फार क्लेश होऊन अंतकाळीं नरकवास प्राप्त होईल. कारण ज्या-वेळेस विवाहित स्त्रीपासून पुत्रप्राप्ती होते त्यावेळीं त्या मनुष्याचे पितर उद्धरतात. मग ते पितर जरी नीच कर्माच्या फळांपासून दुःख भोगीत असले त-रीही ते उद्धरतात व पुत्रपौत्रांस आशिर्वाद देतात. विवाहित स्त्री आपल्या पापपुण्याची वांटेकरी आहे. आतां कदाचित् जर तिचा कांहीं गुन्हाच असेल तर मात्र तिला थोडेंसें शासन करून सदुपदेश करावा. स्त्रीनेंही आपल्या भर्त्यास परमेश्वररूप समजून त्यास तन, मन, धन अर्पण करून त्याच्या सेवेंत सदासर्वदा तत्पर असावें. स्त्रियांना पतीशिवाय दुसरें दैवत नाहीं. पतिसेवा हेंच त्यांचें सुकर्म आहे. ज्या स्थितींत आपणांस परमेश्वरानें ठेवलें असेल त्याच स्थि-

Jagannath

तींत आनंदवृत्तीनें राहिलें असतां त्या उभयतांसही वैकुंठप्राप्ती होईल.

नीति २२ वी. अर्जुना, दिव्याच्या पडछायेंत पुरुषानें उभें राहणें दोषमूलक आहे.

नीति २३ वी. हे फाल्गुना, मूर्खपणानें किंवा दुसऱ्यास कोणत्याहि कारणानें निरपराधी मनुष्यास मारणें पापमूलक असून नरकप्राप्तीचें साधन आहे.

नीति २४ वी. अर्जुना, अन्नशुद्धी केल्याशिवाय भोजन करणें अयोग्य असून प्रेतासमवेत भोजन केल्यासमान आहे. कारण अन्नशुद्धी केल्याशिवाय भोजनास बसलें असतां त्या अन्नास पिशाचें शिवतात. ह्याकरितां अन्नशुद्धी केल्याशिवाय अन्न ग्रहण करूं नये.

नीति २५ वी. अर्जुना, ज्या विस्तवानें दिवा लावला असेल त्याच विस्तवावर पाकनिष्पत्ती करणें अयोग्य आहे. कारण तो अग्नि प्रेतासमान असून अशुद्ध आहे.

नीति २६ वी. फाल्गुना, प्रातःकाळीं घरांचा केर काढून तो घराबाहेरच्या आंगणांत टाकला असतां किंवा तसाच घरांत ठेवला असतां लक्ष्मीच्या शापानें असें कर्म करणारा थोडक्याच दिवसांत दरिद्री होईल.

नीति २७ वी. अर्जुना, विहिरीजवळ, नदीजवळ किंवा तलावाजवळ किंवा कोणत्याही जलाशयाजवळ बहिर्दिशेस जाणारा मनुष्य बहुतकाळपर्यंत नरकवास भोगील.

नीति २८ वी. फाल्गुना, प्रातःकाळीं किंवा संध्याकाळीं घराच्या दरवाज्यांत बसलें असतां पुण्याचा व संपत्तीचा क्षय होऊन ऋणवृद्धी होईल.

नीति २९ वी. अर्जुना, जो मनुष्य एकादशीचे दिवशीं अन्न भक्षण करतो त्याचें जीवित पशुसमान आहे. त्यास अंतकाळीं पंचतत्वांची हत्त्या लागून तो बहुतकाळपर्यंत नरकवास भोगील. ह्याकरितां मनुष्यमात्रास अवश्य आहे कीं,

त्यांनीं एकादशीचे दिवशीं उपवास करून सर्व दिवसरात्र जगच्चालक जो सच्चिदानंद दयाळु परमेश्वर त्यांचे ध्यानांत निमग्न असावें. ह्यापासून पापक्षय होऊन पितृदेवतांस स्वर्गसुख प्राप्त होईल. हें ऐकून अर्जुन ह्मणाला—हे श्रीकृष्णा, कदाचित भूलचुकीनें एकादशीचे दिवशीं कोणी अन्न भक्षण केलें तर त्या पापापासून कसा मुक्त होईल ? श्रीकृष्ण ह्मणाले—अर्जुना, भोजनास बसलें असतां जर आज एकादशी आहे असें समजलें तर ग्रास न घेतां पानावरून उठावें. असें केलें तर प्रत्यक्ष एकादशी केल्याचें श्रेय मिळून पितृदेव स्वर्गसुख भोगतील. ज्या दिवशीं हरिदिनी असेल त्यादिवशीं तांदूळ भक्षण करूं नये. कारण रविवारीं व एकादशीचे दिवशीं पातक ह्या दोन वस्तूंत मिश्र असतें; एवढ्याकरितां एकादशीचे दिवशीं तांदूळ खाणें व रविवारीं लोणी खाणें वर्ज करावें. हा नियम आजारी व

ज्यांना व्रत होत नसेल त्यांसही लागू आहे.

नीति ३० वी. अर्जुना, रजस्वला स्त्रीशीं संग केला असतां त्या महापातकाच्या योगानें तो मनुष्यप्राणी संसारांत रोगग्रस्त होऊन अंतकाळीं हजार वर्षेंपर्यंत नरकवास भोगील. कारण रजस्वला स्त्री पहिले दिवशीं चांडाली, दुसरे दिवशीं ब्रह्महत्यारी व तिसरे दिवशीं रजकी समान होते. यास्तव या तीन दिवसांत स्त्रीच्या वस्त्रास स्पर्श केला असतां किंवा तिचें मुखावलोकन केलें असतां महापातक लागतें. आणि जर तिच्या हातचें भोजन केलें तर भोजन करणारानें जितकें सुकृत केलें असेल तितक्याचा क्षय होतो. एवढ्या करितां मनुष्यमात्रानें चौथे दिवशीं रजस्वला स्त्री स्नान करून शुद्ध झाली असतां तिच्याशीं रत व्हावें. आणि जर चौथे दिवशीं स्त्रीसंग केला नाहीं तर पुत्रहत्त्येचें पातक मस्तकीं चढतें. हें ऐकून अर्जुनानें प्रश्न केला कीं, हे दयासिंधो, एखाद्या स्त्रीचा पति जर देशांतरास गेला असेल

तर कसें करावें ? भगवान ह्मणाले—जर पुरुष घरांत नसेल तर रजस्वला स्त्रीनें चौथे दिवशीं शुचिर्भूत स्नान करून सूर्यनारायणासन्मुख उभें राहून आपल्या पतीची मूर्ती ध्यानांत आणावी ह्मणजे पुत्रहत्येच्या पातकापासून ते मुक्त होतील.

नीति ३१ वी. अर्जुना, कोणाही मनुष्यास कोणताही पदार्थ खाण्याची इच्छा झाली असून जर तो पदार्थ त्यानें खाल्ला नाहीं तर तो मनुष्य आजन्मपर्यंत सदां दुःखी आणि निराश राहील व मृत्युसमयीं त्या मनुष्याचा जीव इच्छित पदार्थांत वास करील. हें ऐकून अर्जुन ह्मणाला—हे नाथ, निर्धन मनुष्यानें जीवाची प्रसन्नता कोणत्या प्रकारानें राखावी. श्रीकृष्ण ह्मणाले—निर्धन मनुष्यानें रविवारीं, जन्मनक्षत्राचे दिवशीं किंवा अमावास्येचे दिवशीं श्रद्धापूर्वक मनेच्छित पदार्थांचें भोजन केलें असतां परमेश्वर त्याची मनकामना पूर्ण करील.

नीति ३२ वी. अर्जुना, कोणाही मनुष्यानें

एखाद्या मनुष्यास एखादी वस्तु देण्याचें वचन दिलें असेल अथवा त्याचें देणें असेल, तर तें द्यावें. न दिल्यास महत्पातक लागतें.

नीति ३३ वी. अर्जुना, आपल्या पोटच्या मुलीचे कांहीं पैसे घेऊन जो मनुष्य दुसऱ्यास मुलगी विकील, तो या पातकाच्या योगानें सदा दरिद्री व दुःखी होऊन, पितृदेवतर्पणापासून विन्मुख होऊन नरकवास भोगील.

नीति ३४ वी. अर्जुना, कोणीही मनुष्यानें एखाद्याजवळ कांहीं वस्तु मागितली आणि ती त्यानें दिली तर देणाऱ्या मनुष्यास अश्वमेधाचें पुण्य प्राप्त होईल. कारण पूर्णब्रह्मपरमेश्वराच्या प्रसन्नतेच्या योगानें जीवाची प्रसन्नता जोडते.

नीति ३५ वी. अर्जुना, कोणीही कोणाजवळ कांहीं वस्तु न मागणें हें त्यास उचित आहे. परमदयाळु परमेश्वरानें मनुष्यमात्रास जें दिलें आहे त्यांतच त्यानें संतोषित असावें.

नीति ३६ वी. अर्जुना, मनकामना पूर्ण होण्याकरितां चतुष्पाद सिंहासनावर बसून जो मनुष्य जगदीशाचें पूजन करितो त्याची ती पूजा फलदायक होणार नाहीं. याकरितां मनुष्यमात्रास उचित आहे कीं; स्वच्छतेनें पवित्रस्थानीं व्याघ्रांबर, मृगाजिन, ऊर्णावस्त्र अथवा दर्भासन घालून पूर्वाभिमुख किंवा उत्तराभिमुख बसून त्रैलोक्यनाथाचें पूजन आणि ध्यानधारणेंकडे मन लावलें असतां फलदायक होईल.

नीति ३७ वी. हे अर्जुना, जो मनुष्य श्रीगंगाभागीरथी अथवा कोणत्याही तीर्थाचें स्नान, किंवा मूर्तीचें दर्शन करण्यास गेला असतां परस्त्रीकडे पापदृष्टीनें पाहील, तर त्या पापापासून तो प्राणी कधींहि मुक्त न होतां अंतकालीं दंडधराचे दूत त्या पापी मनुष्यास नरकवास भोगण्याकरितां घेऊन जाऊन, लोखंडाची तापलेली सळी पापी मनुष्याच्या पोटांत घालतील. हें ऐकून अर्जुन

ह्मणाला—हे वासुदेवा जगद्गुरो, कृपा करून आ-णखीं कांहीं उपदेश करून अज्ञानांधःकाराचा नाश करावा.

नीति ३८ वी. हे अर्जुना, तीर्थस्नानाकरितां वाहनारूढ होऊन गेलें असतां. तीर्थाचें फल लाभत नाहीं.

नीति ३९ वी. हे अर्जुना, चार मंडळींत बसून एखादी वस्तु आपण एकट्यानेंच भक्षण केली तर त्या पापापासून तो कधींही मुक्त होणार नाहीं.

नीति ४० वी. अर्जुना, आदित्यवार, द्वादशी व अमावास्या यादिवशीं व्रतरक्षण करून खिचडी भक्षण करील तर तो प्राणी इतर पदार्थांपासून विन्मुख होऊन त्याची संतानवृद्धी होणार नाहीं.

नीति ४१ वी. अर्जुना, द्वादशीचे दिवशीं पु-राण पठण अथवा श्रवण करणें अगदीं अयोग्य आहे. कारण त्या दिवशीं श्रीव्यास ब्रह्मदेवाच्या पूजनस्मरणांत निमग्न राहतात. एवढ्याकरितां

त्यां दिवशीं पुराण श्रवण किंवा पठण करूं नये.

नीति ४२ वी. हे अर्जुना, व्रतदिनीं अथवा आदित्यवारीं आरशांत पाहूं नये.

नीति ४३ वी. हे अर्जुना, ज्या पलंगावर आपण विवाहित स्त्रीशीं रममाण होतों तो पलंग अथवा बाज दुसऱ्या कोणास देणें महादोष आहे.

नीति ४४ वी. फाल्गुना, तीळ भक्षण करणें महादोष आहे. कदाचित तीळ खाण्यांत आले असतां त्या दोषापासून मुक्त होण्यास ब्राह्मणास तिलदान करावें.

नीति ४५ वी. अर्जुना, लघवी केल्यावर लिंग-प्रक्षालन अवश्य करावें. नाहींतर त्या अघोरी-पणाच्या योगानें सुकर्मफलप्राप्ती होत नाहीं

नीति ४६ वी. अर्जुना, एकाग्रचित्तानें आ-स्थापूर्वक पुराण श्रवण केलें असतां वैकुंठवास प्राप्त होऊन अनेक सुखें भोगील.

नीति ४७ वी. अर्जुना, अनामत ठेविलेल्या

वस्तूचा अभिलाष केला असतां अंतकाळीं नरकप्राप्ती होऊन संतानवृद्धी होणार नाहीं.

नीति ४८ वी. अर्जुना, विवाहित स्त्रीचा विनापराध त्याग करून नीचस्त्रीशीं लंपट होणें किंवा गाईस बुजविणें हें महत्पातक असून नरकप्राप्तीचें साधन आहे.

नीति ४९ वी. अर्जुना, सावकार कर्ज मागण्याकरितां येऊन दारांत बसला असतां त्याजवर क्रोध करून आपण घरांत अन्न भक्षण केलें असतां त्या पापापासून तीन जन्म दरिद्रि होईल.

नीति ५० वी. अर्जुना, आप्त मित्राची हेळणा केली असतां महत्पातक लागतें.

नीति ५१ वी. अर्जुना, जो मनुष्य आपल्याच तोंडानें आपली स्तुती करितो किंवा दुसऱ्यानें स्तुती केली असतां हर्षित होतो तो अंतकाळीं नरकवास भोगील. याकरितां मनुष्यानें आपली स्तुती ऐकून हर्षित होणें अयोग्य आहे.

नीति ५२ वी. अर्जुना, बाग अथवा बागें-तील वृक्ष तोडणें अथवा तलाव किंवा विहीर मातीनें भरणें किंवा पठण केलेल्या विद्येची पुनरावृत्ति न करणें अथवा अनीतीनें चालणें हीं सर्व कर्में नरकवास प्राप्त होण्याचीं लक्षणें आहे.

नीति ५३ वी. अर्जुना, आपले स्वतःचे किंवा परक्याचे बैल किंवा घोडे यांविषयीं अनास्था करणें किंवा त्यांची खाण्यापिण्याची व्यवस्था न ठेवितां क्रूरपणानें वागविणें ह्या पापासारिखें दुसरें कोणतेंच पाप नसून ह्या पापाच्या योगानें दारिद्य प्राप्त होईल.

नीति ५४ वी. अर्जुना, जो मनुष्य रुपयांच्या बदली जमीन कबजांत घेईल तो या पापाच्या योगानें अंध होऊन त्याचे पुत्र ज्वानींत येऊन मरण पावतील.

नीति ५५ वी. अर्जुना, पिता अथवा वडील भाऊ किंवा आपल्यापेक्षां वयानें अधिक अशा

मनुष्यास असत्यवचन बोलणें महत्पाप आहे.

नीति ५६ वी. अर्जुना, रानांत चरत असलेल्या गाईस हांकलणें किंवा बुझविणें महत्पातक असून तो मनुष्य मुक्ती न पावतां पुढले जन्मीं निपुत्रिक होईल.

नीति ५७ वी. हे किरीटि, जो मनुष्य आपल्या पित्याबरोबर किंवा स्वामीबरोबर युद्धसंग्राम करण्याकरितां रणांगणीं जाऊन असमर्थ होऊन स्वामीचा किंवा पित्याचा त्याग करून पळून जाईल तर त्याचें सर्व शरीर रोगग्रहस्त होईल.

नीति ५८ वी. अर्जुना, आपल्या अवस्थेंत केव्हांही स्त्रीसहित गंगास्नान अथवा तीर्थस्नान न केलें तर त्या प्राण्याचें जिणें संसारांत नरकवासाप्रमाणें आहे. ह्याकरितां मनुष्य प्राण्यास उचित आहे कीं, स्त्रीसहित तीर्थस्नान करून श्रद्धेप्रमाणें दानधर्म करून अश्वमेधासमान पुण्य जोडावें. असें केलें असतां तो प्राणी सदा सुखी

राहील. हें ऐकून अर्जुन हस्त जोडून ह्मणाला—हे अंतर्ज्ञानी दयासिंधो, जर एखाद्या मनुष्याला स्त्रीसहित तीर्थस्नान करण्याची ऐपत नसेल तर त्यानें कसें करावें? श्रीकृष्ण ह्मणाले—हे श्वेतवाहना, पौर्णिमेस, संक्रांतीस, पुष्यनक्षत्रीं, सिद्धियोगी अमावास्येस, जन्मनक्षत्रीं अथवा व्यतिपातादि शुभवारीं स्त्रीसहित नदी, तलाव, हौद, अथवा विहीर यांजवर स्नान करून यथाशक्ति दानधर्म केला असतां पापमुक्त होऊन वैकुंठवास प्राप्त होईल.

नीति ५९ वी अर्जुना, दुसऱ्या मनुष्याचें गृहच्छिद्र व्यक्त करणें महत्पातक आहे.

नीति ६० वी. फाल्गुना, व्याहलेल्या गाईचें ८० दीवसपर्यंत दूध काढणें किंवा तिच्या वत्सास न पिऊं देणें हें महत्पातक असून तो प्राणी निपुत्रिक होऊन नरकवास भोगील.

नीति ६१ वी. अर्जुना, आपल्या मुलांना

वाईट रीतीनें वागविणें, त्यांचे हाल करणें व त्यांजला मारणें मोठें पाप आहे.

नीति ६२ वी. अर्जुना, जो कोणी दुसऱ्याच्या हिश्शावर आपला वारसा चालवून तो कबजांत घेईल तर त्याची स्त्री. व्यभिचारिणी होऊनं संतानवृद्धी न होतां चार जन्म अंधत्व येऊन अंतकाळीं दंडधराचे दूत तप्त स्तंभाशीं बांधून पुष्कळ मार देतील व नरककुंडांत टाकतील.

नीति ६३ वी. अर्जुना, चंद्रग्रहणांत किंवा सूर्यग्रहणांत अन्न खाणें व पाणी पिणें किंवा घरांत पाणी भरणें दोषमूलक असून सूर्याचे व चंद्राचे शापानें त्या मनुष्यास संतानाचा व धनसुखाचा लाभ न होतां तो अंतकाळीं नरकवास भोगील.

नीति ६४ वी. अर्जुना, बहिर्दिशेला जाऊन गुदप्रक्षालन करून जें पाणी शिल्लक राहील त्यांतच हात पाय धुणें दोषमूलक असून त्या मनुष्याच्या कुटुंबास पिशाचोपद्रव होईल. कारण तें

शेष पाणी पिशाचादिकांचा भाग आहे. ह्याक-रितां असें करूं नये.

नीति ६५ वी. अर्जुना, ज्या मनुष्याच्या घरीं पुत्रसंतान नसेल त्या मनुष्याचा संसार तुच्छ आहे. हें ऐकून अर्जुनानें प्रश्न केला कीं, हे स्वामिन्, पुत्रहीन मनुष्याला कोणाच्या हातून तर्पण पोहोंचेल ? श्रीकृष्ण अर्जुनाचें भाषण ऐकून हांसून ह्मणाले—हे फाल्गुना, जी गोष्ट तूं मला विचारलीस ती गोष्ट जाणण्यास देवही असमर्थ आहेत, तथापि ज्या अर्थी तूं प्रश्न केलास त्या अर्थी सांगतों तें श्रवण कर. निपुत्रिक मनुष्याची स्त्री सुशील असून जर ती प्रीतिभावानें मन शुद्ध करून तर्पण आणि श्राद्ध करील तर तिच्या पतीला जल पोहोंचेल, व अशा पुनीत स्त्रीच्या सुकर्मयोगानें त्याच्या सप्तपिढ्या उद्धरून जाऊन स्वतः तो जरी नरकवास भोगीत असला तरी वैकुंठधाम पावेल.

नीति ६६ वी. अर्जुना, द्वादशी, अमावास्या व रविवार या दिवशीं अंगाला तैल मर्दन करणें महादोष आहे.

नीति ६७ वी. अर्जुना, घरवस्तीच्या शेजारीं पिंपळाचा वृक्ष लावणें गैर आहे. कारण कीं, प्रतिदिवशीं पितृदेव आपल्या पुत्राच्या घरीं एकवेळ येतात. आपले पुत्र कर्ममार्गानें वर्तन करून ब्राह्मणभोजन घालीत आहेत असें पाहून त्यांस आशिर्वाद देतात, परंतु पिंपळाच्या वृक्षावरील देवता पितृदेवांस येण्यास प्रतिबंध करितात, याकरितां पिंपळाचा वृक्ष राहते घराशेजारीं कधींही लावूं नये व त्याच्या खालीं घृतदीप लावूं नये.

नीति ६८ वी. हे अर्जुना, हा मनुष्यदेह अनेक आयासांनीं प्राप्त होतो. असें असतां अहंकारव्याप्त होऊन या मायिक संसारांत वर्तन करणें अगदीं गैर आहे. या मनुष्यदेहास तीन अवस्था प्राप्त होतात. एक

प्रथमची बाल्यावस्था, दुसरी तरुणावस्था, तिसरी वृद्धावस्था. बाल्यावस्थेंतील सर्वकाळ क्रीडासुखांत निघून जातो. तारुण्यावस्था ऐषआरामादि सुखांत संपते आणि वृद्धावस्थेचा इंद्रियक्षीणतेनें अंत होतो. अशा या मानवी आयुष्याच्या तीन अवस्थांचा तीन प्रकारांनीं शेवट होतो; परंतु मनुष्यप्राण्याचें मुख्य कर्तव्यकर्म या तीनही अवस्थेंत होत नाहीं. तारुण्यावस्थेंत जर परमार्थप्राप्तीचा उद्योग केला नाहीं, तर अंतकालीं नरकवास प्राप्त होतो, एवढ्याकरितां प्रत्येक जीवमात्रानें अहंकारादि षड्रिपूंचा त्याग करून जेणेंकरून पारमार्थप्राप्तीचा मार्ग चोखाळवेळ तितका चोखाळण्याविषयीं झटणें हें त्यास उचित आहे.

नीति ६९ वी. अर्जुना, प्रत्येक मनुष्यप्राण्यानें दररोज पिंपळाचें व महादेवाचें पूजन करणें अत्यावश्यक असून, त्याप्रमाणें न केलें तर संसारांत त्या मनुष्याचें जिणें व्यर्थ आहे. हें ऐकून लागलाच

अर्जुनानें प्रश्न केला कीं, हे दयासिंधो, जर कोणा मनुष्यास पिंपळाचें व महादेवाचें पूजन न घडलें तर त्यानें काय करावें ? श्रीकृष्ण ह्मणाले-किरीटी, जर कोणामनुष्यास पिंपळाचें नित्य पूजन करणें न घडेल तर शनिवारीं तरी अवश्य करावें. कारण त्या दिवशीं पिंपळाचे वृक्षाचे मुळाशीं ब्रह्मदेवाचा वास, मध्यभागीं विष्णुवास आणि अग्रभागीं महेशाचा वास असून, प्रत्येक पानापानाच्या ठायीं देवतांचा वास असतो. याकरितां शनिवारचे दिवशीं पिंपळाची पूजा केली असतां सर्व देवता संतुष्ट होऊन आशिर्वाद देतील. आणि फाल्गुन कृष्ण चतुर्दशीचे दिवशीं श्रीशंकराची पंचामृतयुक्त षोडशोपचारें पूजा करून, रात्रंदिवस महेशस्मरणांत मन निमग्न केलें असतां एक संवत्सरपर्यंत नित्य पूजन केल्याचें श्रेय प्राप्त होऊन अंतीं शिवलोकप्राप्ती होईल.

नीति ७० वी. अर्जुना, स्नान केल्यानंतर मोहा-

नीति ७३ वी. अर्जुना, जो मनुष्य तुळशीचा वृक्ष आपल्या घरीं लावून प्रतिदिवशीं स्नान करून तिची षोडशोपचारें पूजा करील व रात्रीं तुलसी-वृंदावनाजवळ दीप लावील, त्याचे घरीं दंडधराचे दूतांचा प्रवेश होणार नाहीं, इतकेंच नव्हे तर त्याचे घरीं लक्ष्मी वास करून त्यास अश्वमेधाचें पुण्य प्राप्त होईल, जर प्रतिदिवशीं तुळशीचें दर्शन न होईल तर कार्तिकमासीं तरी अवश्य करावें व आंवळीचे झाडाखालीं ब्राह्मणभोजन करावें. असें केलें तर तेंही अश्वमेधासमान पुण्य आहे. परंतु रविवारीं आंवळी-पूजन करूं नये.

नीति ७४ वी. हे अर्जुना, अशुद्धतेनें व अश्रद्धेनें केलेलें तर्पण, श्राद्ध पितृदेवतांस पोंचत नाहीं.

नीति ७५ वी. हे अर्जुना, ज्याच्या घरीं वांझ स्त्री असेल त्याचा संसार नरकवासासमान आहे. वांझस्त्रीच्या हातचें पाणी किंवा अन्न भक्षण करणें

महादोष आहे. या पापापासून मुक्ति पावणें कठीण आहे. हें ऐकून अर्जुन ह्मणाला-हे भगवन्, जर एखाद्या मनुष्याच्या कुटुंबांत वांझ स्त्री असेल आणि तिच्या हातचें खाण्याचा प्रसंग येईल तर या पापापासून तो कशी मुक्ति पावेल ? श्रीकृष्ण ह्मणाले-भोजन करतेवेळेस परमेश्वरनामस्मरण करून जर प्रार्थना केली कीं, हें माझें पापमोचन करावें, असें ह्मणून प्रत्येक घांसास नामोच्चार करून भोजन केलें असतां पापस्पर्श न होतां धनसंतानवृद्धि होईल.

नीति ७६ वी. अर्जुना, एखाद्या मनुष्यानें आणलेलें पाणी त्याच्या हातांतून घेऊन पिणें दोषमूलक आहे. यास्तव दुसऱ्याचे हातांतून पाण्याचें भांडें घेऊन अगोदर तें जमिनीवर ठेवावें नंतर प्राशन करावें.

नीति ७७ वी. अर्जुना, एकवेळ ज्या पात्रांत आपण भोजन केलें असेल, तें पात्र धुतल्या

शिवाय पुनः त्यांत अन्न वाढणें महत्पातक असून अन्नदेवतेच्या शापानें असें करणारा मनुष्य दरिद्री होईल.

नीति ७८ वी. हे अर्जुना, जो मनुष्य आपलें घर व घरासभोंवतालचें आंगणें दररोज झाडून सारवून न ठेवील तर महादेवाच्या व पितृदेवतांच्या शापानें सहामास पर्यंत निर्धन होईल, आणि हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, गृहस्वच्छतेचा अपराध जर पित्याकडून होईल तर पुत्र निर्धन होईल व स्त्रीकडून होईल तर पति नरकवास भोगील.

नीति ७९ वी. अर्जुना, नदी, तलाव अथवा विहीर हीं सोडून घरीं स्नान करणें पापमूलक आहे. हें ऐकून अर्जुनानें प्रश्न केला कीं, हे दयासिंधो, जर नदी, विहीर किंवा तलाव आसपास नसेल तर मनुष्यानें कसें करावें? श्रीकृष्ण ह्मणाले—अर्जुना, जर नदी, विहीर किंवा

तलाव आसपास नसेल तर ज्या पाण्यांत हात बुचकळला नसेल असें पाणी स्नानास घ्यावें, ह्मणजे तें गंगोदकासमान आहे. आणि जर त्यांत हात घातला तर तें पाणी मधुतुल्य होतें. याकरितां ही गोष्ट लक्षांत ठेवणें फार अगत्याचें आहे.

नीति ८० वी. अर्जुना, जो मनुष्य स्नान करून तिलक लावणार नाहीं, त्याचें स्नान पशुतुल्य आहे. स्नान करून गंध लाविल्याशिवाय राहणें दोषमूलक असून नरकवासाचें साधन आहे.

नीति ८१ वी. अर्जुना, कोणतीही चिंता मनांत धरून उदास राहणें गैर आहे. जें भवितव्य असेल त्या प्रमाणें होणार. या गोष्टीवर भरंवसा ठेवून एकाग्रचित्तानें भगवन्नामस्मरण करणें मनुष्यप्राण्यास उचित आहे.

नीति ८२ वी. अर्जुना, मनुष्यमात्रानें नित्य दधिभोजन करणें हितकारक आहे. कारण

हा मानवदेह बहुत प्रयासानें प्राप्त होतो. जर प्रतिदिवशीं दधिभोजन न मिळेल तर प्रतिपौर्णिमेस तरी दधिभोजन अवश्य करावें.

नीति ८३ वी. अर्जुना, मसूर, वांगें आणि लसूण खाणें गैर आहे. कारण या तीन जिनसा मनुष्याच्या पोटांत २१ दिवस पर्यंत जशाच्या तशाच राहतात. ह्या तीन पदार्थांपैकीं जर एखादा पदार्थ भक्षण केला आणि मनुष्य मृत्यु पावला तर त्या प्राण्यास नरकवास प्राप्त होईल. हें ऐकून अर्जुनानें प्रश्न केला कीं, हे दयासिंधो, जर अजाणपणानें ह्या तिहींपैकीं एखादा पदार्थ भक्षण केला, तर कसें करावें ? श्रीकृष्ण ह्मणाले—जर ह्या तिहींपैकीं एखादा पदार्थ भक्षण केला तर त्यावर गंगाजळ प्यावें ह्मणजे दोषनिवृत्ति होईल.

नीति ८४ वी. अर्जुना, अष्टौप्रहर घरांत दिवा जळत असून मध्यें जर तो न विझेल तर

त्या मनुष्याचे पितृदेव प्रसन्न होऊन आशिर्वाद देतील; व त्या आशिर्वादाच्या योगानें धनसंतानवृद्धि होऊन पुढच्या जन्मीं परमेश्वरकृपेनें धनसंतान सुख पावून अंतकालीं वैकुंठवास प्राप्त होईल.

नीति ८५ वी. अर्जुना, जो मनुष्य भोजन करून राहिलेलें अन्न पुनः खाईल अथवा दुसऱ्यास खावयास देईल तो महादोषी होईल.

नीति ८६ वी. अर्जुना, जो मनुष्य अंधारांत भोजन करील किंवा भोजन करीत असतां जर दिवा गेला तर तसाच अंधारांत जेवील तो या दोषाच्या योगानें धनसंतानसुखास पराङ्मुख होईल. अंधारांत भोजन करणें हें प्रेताबरोबर भोजन करण्यासमान आहे.

नीति ८७ वी. अर्जुना, आपल्या डोक्यास घालण्याचें पागोटें दुसऱ्यास घालावयास देणें महादोष आहे. कारण असें केलें असतां देणाराची

बुद्धि मंद होऊन घेणाराची बुद्धि वृद्धिंगत होते.

नीति ८८ वी. अर्जुना, दक्षिण दिशेस पाय करून निजणें फार अशुभ आहे.

नीति ८९ वी. अर्जुना, मुलीला ४ थें वर्ष लागलें ह्मणजे ती पार्वती व सहावें लागलें ह्मणजे कन्या असें समजावें. जो मनुष्य आपल्या मुलीचें अशा स्थितींत लग्न करील त्यास मोठ्या यज्ञाचें फल प्राप्त होईल. आणि १२ वें वर्ष लागलें असतां लग्न करणें महादोष आहे.

नीति ९० वी. अर्जुना, डोक्याला वस्त्र गुंडाळलेलें असून कच्छमुक्त असणें दोषमूलक आहे. अशा मनुष्याचे पितृदेव नरकवासाप्रत जाऊन स्वतः तोही नरकवास भोगील. कारण अशा मनुष्याचें पाऊल धरित्रीवर पडणें ह्मणजे गाईचे अंगावर पाय देण्यासारखें आहे.

नीति ९१ वी. अर्जुना, शिळ्या उदकानें

तर्पण केलें असतां अंतकाळीं घोर नरकवास प्राप्त होऊन पितृदेवांस तें तर्पण पोंहोंचत नाहीं.

नीति ९२ वी. अर्जुना, हातांत, कानांत किंवा गळ्यांत सुवर्णालंकार घालणें. उत्तम फलदायक आहे. कारण स्नान करतेसमयीं त्या सुवर्णास स्पर्श झालेलें उदक गंगोदकासमान आहे.

नीति ९३ वी. अर्जुना, गंगेमध्यें अथवा कोण-त्याही तीर्थामध्यें स्नान करण्याचे अगोदर वस्त्र धुणें महत्पातक आहे.

नीति ९४ वी. अर्जुना, कुटुंबांतील कोणताही मनुष्य जरी गंगास्नानास गेला तरी त्यानें गंगास्नान करून तर्पण केलें असतां पितृदेव संतुष्ट होऊन सर्व कुटुंबास उत्तम अशिर्वाद देतात.

नीति ९५ वी. अर्जुना, एखादा आजारी मनु-ष्य श्रीक्षेत्रीं मृत्यु पावला असतां त्याचें प्रेत अर्ध-वट जाळून तीर्थात टाकूं नये. असें केलें असतां

नरकवास प्राप्त होतो. या करितां मृतमनुष्याचें प्रेत पूर्ण जाळून सप्तदिवसपर्यंत त्याचे रक्षेस गाई-शिवाय इतर कोणाचाही स्पर्श किंवा स्त्रीची सांवली पडूं न देतां आठवे दिवशीं शुचिर्भूत स्नान करून मृतमनुष्याची रक्षा तीर्थांत टाकावी. व ज्या जागेवर प्रेत दहन केलें असेल ती जागा गाईच्या शेणानें स्वच्छ सारवावी. असें केलें असतां मोठमोठ्या यज्ञाचें फल प्राप्त होऊन अंतकाळीं वैकुंठवास प्राप्त होतो.

नीति ९६ वी. अर्जुना, मेघ वर्षत असतां सूर्यो-दय होईल त्यावेळीं स्नान केलें असतां गंगास्नानाचें फल प्राप्त होतें. अशा प्रकारचें स्नान देवांदिकांसही दुर्लभ आहे.

नीति ९७ वी. अर्जुना, सूर्यास्ताच्या वेळीं भोजन करणें, पाणी पिणें, किंवा बहिर्दिशेस जाणें महादोष आहे. कारण ज्यावेळीं सूर्यास्त

होतो, त्यावेळीं सूर्याचें आणि देवतांचें युद्ध होत असतें. ह्यास्तव त्यावेळीं मनुष्यानें ईश्वरस्तवनाशिवाय दुसरा कोणताही व्यवसाय करूं नये. ज्यावेळीं अर्धसूर्यास्त होतो त्यावेळीं अर्घ्यप्रदान केलें असतां सूर्यनारायण संतुष्ट होऊन आशिर्वाद देतात. सूर्यास्तसमयीं नीच कर्म केलें असतां पुष्कळ वर्षें निर्धनत्व प्राप्त होतें. इतकेंच नव्हे तर सूर्यास्त होण्याच्यापूर्वीं चार घटका व अस्तानंतर चार घटका आणि सूर्योदयापूर्वीं चार घटका व उदयानंतर चार घटका निजून राहणें महादोष आहे, अशावेळीं परमेश्वरस्मरण व जगदीशाची ध्यानधारणा केली असतां किंवा पुराण पठण केलें असतां सर्व पापांचा क्षय होऊन अंतीं वैकुंठवास प्राप्त होईल.

नीति ९८ वी. अर्जुना, हातामध्यें भाकरी घेऊन खाल्ली असतां थोडक्याच काळांत दरिद्र प्राप्त होतें.

नीति ९९ वी. अर्जुना, धनसंपत्ति व संतान

ह्यांची अतितृष्णा व हेवा केला असतां निर्धनत्व प्राप्त होऊन अंतीं नरकवास व पुढच्या जन्मीं निपुत्रिकत्व प्राप्त होतें.

नीति १०० वी. अर्जुना, पोटीं पुत्रसंतान नसलें तर संसारांत मानमान्यता न मिळतां अंतीं नरकवास प्राप्त होतो.

नीति १०१ वी. अर्जुना, स्त्री प्रसूत झाल्यावर ४५ दिवसपर्यंत तिच्या हातचें उदक प्राशन करणें किंवा अन्न खाणें नरकवासाचें साधन असून त्या मनुष्याचे पितृदेव जरी वैकुंठवास भोगीत असले तरी नरकवास भोगतील. हें ऐकून अर्जुनानें प्रश्न केला कीं, हे दीननाथ, एखादा मनुष्य जर घरचा एकटा असला तर त्यानें कसें करावें? श्रीकृष्ण ह्मणाले—तेरा दिवसांनंतर किंवा तेवीस दिवसांनंतर स्त्रीनें गंगास्नान केल्यावर तिच्या हातचें अन्न किंवा पाणी ग्रहण करण्यास हरकत नाहीं. हें ऐकून अर्जुन चकित होऊन

दोन्ही हात जोडून आणखी कांहीं आज्ञा सांगण्याविषयीं प्रार्थना करूं लागला असतां देवादिकांस अगम्य अशा आज्ञा श्रीकृष्ण त्यास सांगूं लागले:—

नीति १०२ री. अर्जुना, चित्तप्रसन्नतेनें कोणतेंही कृत्य केलें असतां तें अधिक फलदायक होतें. उदासवृत्तीनें व क्रोधानें केलेलें पुण्यकर्म फलदायक न होतां उलट पातक मात्र लागतें.

नीति १०३ री. अर्जुना, आपला पोटचा मुलगा दुसऱ्यास दत्तक दिला असतां त्यानें केलेलें तर्पण आपणास पोंचत नाहीं दत्तक दिलेला मुलगा परत घेतला असतां पुढच्या जन्मीं धनसंतानसुख न मिळतां नरकवास प्राप्त होईल. हें ऐकून अर्जुनानें प्रश्न केला कीं, हे सच्चिदानंदस्वामिन्, एखाद्या मनुष्यानें अज्ञानत्वानें आपला दिलेला पुत्र परत घेतला असतां तो त्या पापापासून कसा मुक्ति पावेल? श्रीकृष्ण ह्मणाले—अर्जुना, त्या मनुष्यानें स्त्रीसहित

व पुत्रासहित गंगेंत स्नान करून पिंवळा, लाल, धूम्रवर्ण, शुभ्र, हिरवा ह्या पांच रंगांच्या पांच गाई दुभत्या घेऊन, त्यांचे खूर, पृष्ठ व शिंगें सुवर्णमय मढवून त्या गाई सुपात्र ब्राह्मणास दान कराव्या व परब्रह्मपरमेश्वराचें ध्यान करून अपराध क्षमा करण्याविषयीं त्याची प्रार्थना करावी.

नीति १०४ थी. अर्जुना, युद्धसंग्रामीं धनसंपत्तीच्या गर्वानें व बळगर्वानें मदोन्मत्त होऊन शत्रूला वाग्बाणानें ताडण करील तर त्याचें सर्व बळ नष्ट होऊन तो रणांगणीं नष्ट होईल.

नीति १०५ वी. अर्जुना, रणांगणीं युद्ध करितां करितां शत्रू बलहीन होऊन शरण येईल तर त्यास जीवदान द्यावें, परंतु जर त्यास जीवदान न देतां ठार मारलें तर या पातकाच्या योगानें पुत्रसंतानाचा नाश होऊन पुढल्या जन्मीं त्याची स्त्री वांझ राहील.

नीति १०६ वी. अर्जुना, कागदावर अथवा

लांकडावर मनुष्याचें किंवा जनावराचें चित्र काढणें महादोष असून, त्या दोषाच्या योगानें या जन्मांत व पुढच्या जन्मांत धनसंतानसुख प्राप्त होणार नाहीं, व डोळ्यांस अंधत्व प्राप्त होईल; परंतु परमेश्वराची किंवा सत्पुरुषाची प्रतिमा कागदावर किंवा लांकडावर काढून; त्याची प्रतिष्ठा केली तर धनसंतानसुखाची वृद्धि होईल.

नीति १०७ वी. अर्जुना, बोलतांना आपल्या तोंडांतील थुंकी दुसऱ्याच्या अंगावर उडेल तर पुढल्या जन्मीं डुकराचा देह प्राप्त होऊन अंतकाळीं नरकनिवासी होईल.

नीति १०८ वी. अर्जुना, जो मनुष्य आपल्या धन्याच्या आज्ञेचा अवमान करील तो सदा दुःखी होऊन अंतीं नरकवास भोगील. कारण स्वामीची अवज्ञा करणें महत्पाप आहे. हें ऐकून अर्जुनानें प्रश्न केला कीं, हे यदुनाथा, जर स्वामी सेवकाक-

ऊन एखादें काम न होईल अशी आज्ञा करील तर ह्या पापापासून तो चाकर कसा मुक्त होईल? श्रीकृष्ण ह्मणाले–अर्जुना, सेवकास सांगितलेली कठीण चाकरी जितके दिवस सेवकाकडून होणार नाहीं, तितके दिवसांचा पगार जर चाकरानें धन्यापासून घेतला नाहीं, तर तो सेवक त्या पापापासून मुक्त होईल. अर्जुन ह्मणाला–हे स्वामिन्, जर स्वामी निर्धन होऊन सेवकांचा पगार देण्याचें सामर्थ्य त्याजला न राहील, तर त्यानें कसें करावें? श्रीकृष्ण ह्मणाले–अर्जुना, सेवकाच्या राहिलेल्या पगाराचा चतुर्थांश दान धर्म करून अपराधाच्या क्षमेबद्दल परमेश्वराची प्रार्थना केली असतां त्या पापापासून मुक्त होईल.

नीति १०९ वी. अर्जुना, हवेली, तलाव, विहीर आदिकरून ठिकाणें तयार करणें महत्पुण्य आहे, परंतु हीं वरील ठिकाणें अर्धवट तयार

करून त्यांत भोजन करणें महत्पातक आहे. या-स्तव जेव्हां वरील ठिकाणें संपूर्ण तयार होतील, तेव्हां ग्रहप्रतिष्ठा करून व गोदान करून संपूर्ण कुटुंबासहित भोजन केलें असतां अश्वमेधयज्ञाचें फल प्राप्त होऊन धनसंतानसुख प्राप्त होईल.

नीति ११० वी. अर्जुना, महायात्रा अथवा तीर्थस्नान किंवा देवदर्शन करण्यास जात असतां वाटेनें मेजवान्या घेत जाणें महादोष आहे. या दोषा-पासून मनुष्यप्राणी संसारांतील सर्व वस्तूंस विमुख होऊन यात्रा, स्नान किंवा देवदर्शन श्रेयस्कर होणार नाहीं. हें ऐकून अर्जुनानें प्रश्न केला कीं, हे भगवन्, भक्तवत्सला, महायात्रेस अथवा तीर्थस्नानास किंवा देवदर्शनास जात असतां वाटेंत भाऊबंध किंवा ना-तेवाईक अथवा इष्टमित्र असले आणि त्यांनीं मेज-वानीस बोलविलें तर कसें करावें ? श्रीकृष्ण म्ह-णाले—अर्जुना, जातांना मात्र कोणाकडेही जाऊं

नये. येतांना गेलें असतां दोष नाहीं. परंतु देवस्थानावर किंवा तीर्थावर गेलें असतां इष्टमित्रांच्या आग्रहानें जर मेजवानीस जाण्याचा प्रसंग आला तर जें अन्न भक्षण केलें असेल त्याच्या वीसपट अन्न ब्राह्मणास दिलें असतां दोषमुक्त होऊन फलप्राप्ति होते.

नीति १११ वी. अर्जुना, ज्याच्या अंगावर पिसें आलीं नाहींत अशा पक्ष्यांच्या पोरानां त्यांच्या घरोट्यांतून बाहेर काढणें महत्पातक असून या पातकाच्या योगानें दरिद्र प्राप्त होऊन पुत्र संतति तरुण होऊन मृत्यु पावेल आणि अंतकाळीं नरकवास प्राप्त होईल. व पुढच्या जन्मीं धनसंतानसुख प्राप्त होणार नाहीं, कारण मनुष्याचा स्पर्श पक्ष्यांच्या मुलांना झाला असतां पक्षी त्यांस स्पर्श न करितां त्यांचें पालणपोषण करीत नाहींत. अशी त्यांची आबळणा झाली ह्मणजे तीं भुकेनें व संगोपनाच्या आबळणेमुळें प्राणत्याग करितात. व हें पातक त्या मनुष्याच्या माथीं चढतें.

नीति ११२ वी. अर्जुना, गोदोहन करीत असतां गाईच्या अंगावरचा केंस तुटून पडला असतां महादोष असून दूध गाळल्याशिवाय पिणें दोषार्ह आहे. एवढ्याकरितां मनुष्यानें दूध गाळून ऊन करून प्यावें.

नीति ११३ वी. अर्जुना, जो पुरुष अथवा स्त्री मुलांना रडत ठेवून कुकर्मप्रवर्तक होईल अथवा त्यांस मारील तर त्यांस नरकवास प्राप्त होईल. व सर्व पदार्थांपासून विमुख होऊन निपुत्रिक होतील. कदाचित मुलें असल्यास तरुणपणीं मृत्यु पावतील आणि पितृदेव नरकवास भोगतील.

नीति ११४ वी. अर्जुना, मुखप्रक्षालन केल्याशिवाय पान किंवा दूध अथवा हरएक वस्तु खाही असतां पुष्कळ दुःख भोगावें लागतें.

नीति ११५ वी. अर्जुना, कोणत्याही वृक्षाचें अपक्क फळ तोडणें महत्पातक आहे.

नीति ११६ वी. अर्जुना, नोकरलोकांचा पगार न देणें किंवा उपकारकर्त्यांचे उतराई न होणें हें महत्पातक असून तो प्राणी निपुत्रिक होऊन अंतकाळीं नरकवास भोगील आणि त्याचे पितृदेव स्वर्गवासी असल्यास नरकवास भोगतील.

नीति ११७ वी. अर्जुना, जी वस्तु ब्राह्मणास दान करावयाची असेल ती वस्तु एखाद्या पात्रांत घालून तें पात्र हातांत घेऊन ब्राह्मणानें तथास्तु ह्मटल्यावर वस्तु, पात्र आणि हात यांजवर ब्राह्मणाची सत्ता होते. अशी सत्ता झाल्यावर दानाची वस्तु, पात्र व हाताच्या ऐवजीं सोनें, रुपें अथवा तांबें ह्याचा हात करून ब्राह्मणास द्यावा. असें जर न केलें तर त्या हातानें कोणत्याही प्रकारचें केलेलें सुकृत फलरूप होत नाहीं. हें ऐकून अर्जुनानें प्रश्न केला कीं, हे दयासिंधो, जर एखाद्या मनुष्यास असें करण्याचें सामर्थ्य नसेल तर त्यानें कसें करावें?

श्रीकृष्ण ह्मणाले—असें करण्याचें जर सामर्थ्य नसेल तर एखादें वस्त्र सुपात्र ब्राह्मणास दिलें असतां दोषमुक्त होईल.

नीति ११८ वी. अर्जुना, विधुर मनुष्यानें दुसरें लग्न केलें असतां संसारांत त्यास फारशी सुखप्राप्ती होणार नाहीं. अर्जुनानें प्रश्न केला कीं असें होण्याचें कारण काय ? श्रीकृष्ण ह्मणाले—निपुत्रिक विधुरानें दुसरें लग्न केल्यास फारशी हरकत नाहीं. पण ज्याला पुत्रसंतान असून त्यानें जर दुसरें लग्न केलें तर नवी स्त्री पूर्वी झालेल्या मुलांचें ममतेनें संगोपन करीत नाहीं. असें झालें ह्मणजे त्या मुलांचे शाप पित्याच्या शिरावर बसतात.

नीति ११९ वी. अर्जुना, जारकर्म करणें व खोटें बोलणें हीं दोन कर्मे निषिद्ध असून ह्या पासून धनवृद्धि न होतां नरकप्राप्ती मात्र होते.

नीति १२० वी. अर्जुना, भाट,. भांडखोर व

लबाड ह्या तिन्हीं पैकीं कोणालाही कांहीं देणें घोर नरकांचें साधन आहे. कारण हे तिन्हीं प्रकारचे मनुष्य मिथ्यावचनीं, अपकीर्तिवर्धक व स्तुतिपाठक आहेत. लाज, काज, गृह, बुद्धि इत्यादि गुण ह्यांचेठायीं पूर्णपणें वसत असल्यामुळें ह्यांस धन देणारास अंतीं नरकवास प्राप्त होऊन पुढच्या जन्मीं ह्या तिन्हीं प्रकारच्या जन्मांतून कोणता तरी एक जन्म प्राप्त होतो, यास्तव त्यांस धन देणें दुःखमूलक आहे.

नीति १२१ वी. हे अर्जुना, बहिर्दिशा अथवा लघवी करून आल्यावर स्नान केल्याशिवाय कोणतेंही दानपुण्य केलें असतां तें फलद्रूप न होतां अंतीं नरकवास प्राप्त होतो.

नीति १२२ वी. अर्जुना, चौथे दिवशीं हातापायांचीं नखें न काढलीं तर अथवा सातवे दिवशीं श्मश्रू न केला तर त्यानें केलेलें शुभकृत्य निष्फळ होईल.

नीति १२३ वी. अर्जुना, चतुर्दशी व अमावास्या किंवा रविवार व मंगळवार ह्या दिवशीं जन्मलेल्या मनुष्यानें त्या दिवशीं हातापायांचीं नखें काढणें पापमूलक आहे, करितां त्या दिवशीं त्या निरनिराळ्या देवतांचीं पूजनें केलीं असतां धन, संतति प्राप्त होऊन अंतीं वैकुंठवास प्राप्त होईल.

नीति १२४ वी. अर्जुना, आदल्या दिवसाचें शिळें अन्न भक्षण केलें असतां शरीरप्रकृति रोगग्रस्त होऊन अंतीं नरकवास प्राप्त होतो. संतती दुःखी होते. हें ऐकून अर्जुनानें प्रश्न केला कीं, हे भगवन्, ह्या पापापासून मुक्तता कशी होईल? श्रीकृष्ण ह्मणाले—गोड पदार्थ असून तो शिळा खाल्ला असतां हरकत नाहीं. परंतु शिळें अन्न मात्र खाऊं नये. कारण त्यापासून रोग उत्पन्न होऊन बुद्धिमांद्य, आळस, निद्रा, ह्यांची वृद्धि होते.

नीति १२५ वी. अर्जुना, स्वामिसेवेंत निराळ-

स्यता ठेवणें व लोभ न करणें, दुसरें सेवकांवर प्रीति करणें व तिसरें क्रोध न करणें; ह्या तीन गोष्टी चांगल्या लक्षांत वागविल्या असतां या लोकीं व परलोकीं सुखप्राप्ती होते.

बालक्रीडेंतील श्लोक प्रारंभ.

करीकौतुकगोकुळींचक्रपाणी ॥ रडेबालकमायपूसेसुजाणीं ॥ तुलाआवडेकायचित्तींमुकुंदा ॥ ह्मणें यशोदाबारेपुरवीनछंदा ॥ १ ॥ जरीआवडेदूधसाईतुलारे ॥ दहींभातपोळीमलासांगबारे ॥ असेदुग्धआटींवअन्नव्हावें ॥ मलासांगरेकायबातेंकरावें ॥ २ ॥ नबोलेचिकांहींहरीएकदोनी ॥ रडेआरडेमागुतीचक्रपाणी ॥ ह्मणेमाउलीनीजबाकान्हयारे ॥ तुलासांगतेंगोष्टत्यातान्हयारे ॥ ३ ॥ अशागो

पिकाअंगणींआलियारे ॥ तुलाखेळवूंमागुतीजा
णबारे ॥ असेआलिराधातुलामागताहे ॥ असें
ऐकतांकृष्णऊठोनीपाहे ॥ ४ ॥ मलादाविंमांतक
शीकोणराधा ॥ कडेघेउनीद्वारिंआलीमुकुंदा ॥
हरीहेचीराधाबरीपाहेंबारे ॥ ह्मणेंद्यावामामीकरींहा
तह्मोरे ॥ ५ ॥ तिलापाहतांसावळांझेंपघाली ॥ ह
रीपाहुनीराधिकांतेनिवाली ॥ कडेघेउनीराधिकाबै
सेखालीं ॥ हरीपाहुनीकामनातूरझाली ॥६॥ कडेघेउ
नीखेळवीतेसुजाणी ॥ उगाराहिलानारडेचक्रपाणी ॥
ह्मणेमाउलीयासनेईघरागे ॥ रडेआक्रोशेंकामनेदीक
रूंगे ॥ ७ ॥ मलाकामआहेघरींफारमामी । जरीहा
रडेलकरूंकायहोमी ॥ ह्मणेयशोदागृहींनेईतयाला ॥
पाजोनिदुग्धानीजविंगेमुलाला ॥ ८ ॥ हरीघेउनी
राधिकांतेनिघाली ॥ घरींआलियावृद्धहाटासिगेली ॥
असेसासुरातोहिगांवासिगेला ॥ तिचाकांततोगाई
चारूनिआला ॥ ९ ॥ अशाभावनेंअंगशेजेनिघाली ॥

त्वरेंचालतांकंपितांकंपितझाली ॥ मूर्छादाटलीव्याकुळसुंदराते ॥ तिचेंचित्तत्याजाणिलेंगोपिनाथें ॥ १० ॥

छंद.

व्याकुळचित्तहेंपाहुनीमती ॥ वाढलात्वरेंलक्ष्मीपती ॥ वस्त्रभूषणेंशोभलाहरी ॥ तेजफांकलेंफार मंदिरीं ॥ ११ ॥

श्लोक.

हरीरूपसौंदर्यहेंतेजकाया ॥ वर्षेषोडषदिव्यरूपेंरमाया ॥ ह्मणेतोहरीपाहेंआतांसखेकीं ॥ तयापाहतांपह्लवीं मूखझांकी ॥ १२ ॥ उठेसुंदराआडलाजोनिराहे ॥ निवेअंतरींकृष्णचारित्र्यपाहे ॥ धरीपह्लवींतोहरीराधिकेसी ॥ सवेंघेऊनीचालिलामार्गनेसीं ॥ १३ ॥ हरीस्पर्शतांमंचकींआलिराधा ॥ रमेकौतुकेंसौख्यझालेंमुकुंदा ॥ ह्मणेतोहरीपाहेंआतांसखेकीं ॥ असेंऐकतांपह्लवें मूखझाकी ॥ १४ ॥ असेंक्रीडतांकांतबाहेरआला ॥ ह्मणेद्वारखोलींतदाराधिकेला ॥ असेंऐकतांवाक्यका

नींतयाचें ॥ भयेंसूकलेंमूखत्याराधिकेचें ॥ १५ ॥ क
रीप्रार्थनासानहोईमुरारी ॥ उभाराहिलाकांतयेऊनि
द्वारीं ॥ त्वरेंवाढतांवेळनाहींमलागे ॥ कसासानहोऊं
मलासांगतूंगे ॥ १६ ॥ जरीअसतोंसानगेथोरहो
तों ॥ कसामीआतांसानहोऊंसखेतो ॥ असेंऐ
कतांलोचनींवाहेपाणी ॥ गळालीमतीतीरडेदीनु
वाणी ॥ १७ ॥ असीप्रार्थनाकरीतांकृष्णजीला ॥
मूर्छादाटलीसेतियेराधिकेला ॥ स्वयेंनीजयेलेजया
जन्मझाला ॥ त्वरेंवंदिलेंलहानव्हावेंतयाला ॥
॥ १८ ॥ हरीबालकहोऊनीयांत्वरेसी ॥ करेंथाप
टीऊठवीराधिकेसी ॥ कसेंरूपहेंझणिपाहेमलागे ॥
कसीनीजलीझोंपआलीतुलागे ॥ १९ ॥ असेंबो
लतांराधिकेसींहरीनें ॥ नेत्रउघडीलेतयाराधिकेनें
॥ तयापाहतांहर्षआनंदझाला ॥ त्वरेंकाढिलेंवा
रिचेआडण्याला ॥ २० ॥ बहूक्रोधआलातयागौ
ळियासी ॥ ह्मणेयेवढावेळकांलाविलासी ॥ स्वयें

धऊनीनीजलेंकान्हयाहो ॥ तयाप्रार्थितांझोंपआ
लीमलाहो ॥ २१ ॥ पुढेंदेखिलासांवळागौळियानें
॥ ह्मणेबाळगेरूपसौंदर्यतान्हें ॥ सदाधेउनीयावेंया
तेंघृसला ॥ मनींहर्षझालातियेराधिकेला ॥ २२ ॥

समाप्त.